**Bachelor of Arts (B.A.) Part–II Examination**

**MARATHI (New)**

**(Compulsory )**

**(Other Language)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

1. 'एक नवी पहाट जन्माला येत आहे' असे निर्मलकुमार फडकुले का म्हणतात ?

**किंवा**

"जगातील सर्वात श्रेष्ठ कलावंत म्हणजे शिक्षक होय" हे राष्ट्रसंताचे विधान साधार विशद करा. 10

2. 'एका नव्या संघर्षात' या कवितेचे आशय सौंदर्य विशद करा.

**किंवा**

कवी राम जोशी यांनी वैराग्याच्या नावावर माजलेल्या दांभिकतेचा समाचार कसा घेतला आहे ? 10

3. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी शंभर शब्दांत लिहा :

**गट–अ**

(क) ताराबाई शिंदे यांनी 'स्त्रीपुरुषतुलना' या निबंधात पुनर्विवाहाचा पुरस्कार कसा केला ?

(ख) चक्रधरांनी 'रूंभणेयाचा दृष्टान्त' या पाठातून कोणते तत्वज्ञान सांगितले आहे ?

(ग) शेतकऱ्यांची दूरवस्था कवी यशवंतांनी कशी विशद केली ?

(घ) विट्ठलभक्तीचे माहात्म्य नामदेवांच्या अभगांतून कसे प्रत्ययाला येते ?

**किंवा**

**गट–ब**

(च) 'तपस्वी' चे व्यक्तिचित्र थोडक्यात स्पष्ट करा.

(छ) निष्पर्णतेचे कवच धारण करणारा माघ लेखिकेला अमोघ सृजनतेचे प्रतीक का वाटतो ?

(ज) जीवनातील कोणत्या प्रसंगांनी कवीचे 'डोळे' भरून येतात ?

(झ) कवी आणि निसर्ग यांचे नाते 'ह्या नभाने' या कवितेतून कसे व्यक्त होते ? 20

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दांत लिहा :

**गट–क**

(त) वृत्तपत्रे आणि नियतकालिके यातील फरक स्पष्ट करा.

(थ) अहवालात्मक इतिवृत्ताचे स्वरूप सांगा.

(द) मुलाखत घेण्यापूर्वी कोणती तयारी करावी लागते ?

(ध) भावानुवाद म्हणजे काय ?

**किंवा**

**गट–ख**

(प) बातमी लिहिताना कोणती काळजी घ्यावयाची असते ?

(फ) इतिवृत्त लिहिताना कोणती पथ्ये पाळावीत ?

(ब) मुलाखत लेखनाचे तंत्र सांगा.

(भ) लक्ष्यनिष्ठ भाषांतर म्हणजे काय ? 20

5. पुढील **सर्व** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :

(1) 'शिक्षक हाच राष्ट्राचा भाग्यविधाता' असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज का म्हणतात ?

(2) कोणत्याही संताच्या चिंतनाचा आणि कार्याचा केंद्रबिंदू 'माणूस' हाच असतो. असे निर्मलकुमार फडकुले यांनी का म्हटले आहे.

(3) 'न्यायासाठी' या कवितेचा आशय संक्षिप्त रूपात स्पष्ट करा.

(4) 'मृत्यू' हेच अंतिम सत्य आहे याची जाणीव सुरेश भटांनी कशी करून दिलेली आहे. 20

6. खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांचे योग्य पर्याय निवडा :

(1) केशीराजबासांना ________ ह्या नावाने देखील ओळखले जाते.

(अ) केसोबोस (ब) खळोव्यास

(क) म्हाइंमभट (ड) यापैकी नाही

(2) चंद्रभागा नदीचा उगम ________ डोंगरावरून आला.

(अ) सातपुडा (ब) सहयाद्री

(क) ज्ञानेश्वरी (ड) भीमाशंकर

(3) 'स्त्रीपुरुषतुलना' या पाठाच्या लेखिका ________ ह्या होत.

(अ) इरावती कर्वे (ब) दुर्गा भागवत

(क) ताराबाई शिंदे (ड) यापैकी नाही

(4) राजेशच्या संस्थेमध्ये ________ चा खगोलशास्त्रज्ञाचे व्याख्यान आयोजित केले होते.

(अ) वेणू बप्पू (ब) रिचर्ड स्मिथ

(क) फ्रीमन डायसन (ड) वॅाटसन

(5) प्र. क्रे. अत्रे यांना वक्तृत्वस्पर्धेत ________ ग्रंथ बक्षीस मिळाला.

(अ) स्थापत्यशास्त्रावरील (ब) तुकारामाची गाथा

(क) ज्ञानेश्वरी (ड) लीळाचरित्र

(6) 'न्यायासाठी' ही कुसुम अलाम यांची कविता ________ या प्रवाहाचे प्रतिनिधित्व करते.

(अ) दलित साहित्य (ब) आदिवासी साहित्य

(क) ग्रामीण साहित्य (ड) स्त्रीवादी साहित्य

(7) 'दिनाची माऊली। अजि म्यां देखियेली।।' या काव्यपंक्ती कोणाच्या ?

(अ) संत नामदेव (ब) संत एकनाथ

(क) संत तुकाराम (ड) यापैकी नाही

(8) 'दशपदी' ची रचना ________ या कवीने केली.

(अ) यशवंत (ब) अनिल

(क) सुरेश भट (ड) नारायण सुर्वे

(9) 'श्लोक केकावली' हे काव्य ________ या कवीचे आहे.

(अ) मोरोपंत (ब) वामन पंडित

(क) रघुनाथ पंडित (ड) मुक्तेश्वर

(10) 'भला जन्म हा तुला लाभला' या लावणीचे कर्ते ________ हे होत.

(अ) राम जोशी (ब) परशराम

(क) सगनभाऊ (ड) होनाळी बाळा

(11) मुलाखत हा मानवी व्यक्तिमत्त्वाचा ________ एक प्रकार आहे.

(अ) सर्वेक्षणाचा (ब) लेखनसामर्थ्याचा

(क) अभ्यासाचा (ड) साक्षात अभिव्यक्तीचा

(12) एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत आणणे याला ________ म्हणतात.

(अ) भाषांतर (ब) भावार्थ

(क) सत्यार्थ (ड) पुनर्निर्मिती

(13) कार्यालयीन सभेच्या कामकाजाची नोंद म्हणजे ________ होय.

(अ) वृतान्त (ब) अहवाल

(क) इतिवृत्त (ड) यापैकी एकही नाही

(14) ठराविक कालाने ज्याचे प्रकाशन होते त्यास ________ असे म्हणतात.

(अ) बातमी (ब) नियतकालिक

(क) वृत्तपत्रे (ड) आकाशवाणी

(15) इंग्रजी व मराठी या भाषांमधील वाक्यरचनेतील पदक्रम ________ असतो.

(अ) विसंगत (ब) सारखा

(क) वेगवेगळा (ड) नेहमीसारखा

(16) इतिवृत्त लेखन हे पूर्णत: ________ असते.

(अ) घटनानिष्ठ (ब) व्यक्तिनिष्ठ

(क) वस्तुनिष्ठ (ड) वाचकनिष्ठ

(17) बातमीची यशस्विता ही ________ अवलंबून असते.

(अ) मथळ्यावर (ब) घटनेवर

(क) तपशीलावर (ड) निवेदनावर

(18) मूळ भाषेतील मजकूराचे शब्दश: भाषांतर केले जाते त्याला ________ म्हणतात.

(अ) लक्ष्यनिष्ठ भाषांतर (ब) मौखिक भाषांतर

(क) मूल्यनिष्ठ भाषांतर (ड) वृत्त भाषांतर

(19) मूल भाषेतील साहित्यकृतीतील भावार्थ लक्ष्य भाषेत आणणे त्यास ________ म्हणतात.

(अ) भावानुवाद (ब) रूपांतर

(क) मुक्त अनुवाद (ड) यापैकी एकही नाही

(20) मुलाखत घेणे म्हणजे ________ होय.

(अ) व्यक्तीला समजून घेणे (ब) कर्तृत्वावर प्रकाश टाकणे

(क) व्यक्तीचे वैचारिक आकलन करणे (ड) वरील सर्व 20